# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.06.2024** **वार – बुधवार**

---

**योग**

यावर्षीचा दहावा आंतरराष्ट्रीय योग दिवस –स्वतःसाठी आणि समाजासाठी योग- या मध्यवर्ती संकल्पनेवर आयोजित करण्यात येत आहे. पुण्यातील राष्ट्रीय निसर्गोपचार संस्थेद्वारे यानिमित्त तीन ठिकाणी योगासनांची प्रात्यक्षिकं आयोजित केली आहेत. त्यामध्ये, बापू भवन, येवलेवाडी इथलं निसर्ग ग्राम आणि गोहे बुद्रुक इथलं निसर्ग साधना केंद्र समाविष्ट आहे. प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय, मध्य रेल्वे, पुणे दिवाणी न्यायालय आणि आसपासच्या अनेक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये देखील नंतर ही प्रात्यक्षिकं घेतली जाणार आहेत.

**योग**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनंयोग दिनानिमित्त शहरातील विविध भागात 13 ठिकाणी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आले आहे. शहरातील आठ क्षेत्रीय कार्यालयांच्या अंतर्गत महापालिकेच्या बॅडमिंटन हॉलमध्ये योग दिनाचा कार्यक्रम होणार आहे. शालेय विद्यार्थी आणि नागरिकांनी यामध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवावा असं आवाहन महापालिकेच्या वतीनं करण्यात आलं आहे.

**पालखी-तयारी**

यावर्षी पालखी सोहोळ्यासाठी गतवर्षीपेक्षा अधिकचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. सर्व कामं पारदर्शकता ठेऊन वेळेत पूर्ण करावीत. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी, पालखी मार्ग आणि विसावा स्थानांवर स्वच्छता राखली जाईल याची विशेष खबरदारी घ्यावी असे निर्देश ग्रामविकास आणि पंचायतराज मंत्री गिरीष महाजन यांनी आज पुण्यात आढावा बैठकीत दिले.

**टँकर**

जून महिन्याच्या उत्तरार्धात देखील पुणे महसूल विभागातील पुणे जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे 227 पाण्याचे टँकर सुरु असून त्याद्वारे साडेतीन लाखाहून अधिक लोकांना पाण्याचा पुरवठा केला जात आहे. पुणे विभागात दमदार पावसाची प्रतीक्षा असल्यानं अनेक गावं, वाड्या वस्त्या आणि 4 लाखाहून अधिक पशुधन देखील पाण्यासाठी टँकरवरच अवलंबून आहे.

**लोणावळा**

दरवर्षी पावसाळ्यात लोणावळा परिसरात होणारी पर्यटकांची गर्दी आणि वाढते अपघात लक्षात घेऊन लोणावळा शहरात अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्याचा आदेश जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी जारी केला आहे. येत्या आठवडाभरात राज्याच्या विविध भागात पाऊस सक्रिय होण्याचा अंदाज असून लोणावळा खंडाळा परिसरात पावसाचं प्रमाण जास्त असतं.

**बांधकाम**

पुणे महापालिकेत समाविष्ट 11 गावांचा विकास आराखडा राज्य सरकारनं ताब्यात घेतला आहे. या विकास आराखड्याला अद्याप मंजुरी देण्यात आली नाही. समाविष्ट 11 गावांतील बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार पुणे महापालिकेला

देण्यात यावेत, अशी मागणी राज्य सरकारच्या नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवाकडे केली आहे अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी पत्रकारांना दिली.

**अटी**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या परदेशी शिष्यवृत्तीमध्ये समान धोरणाच्या नावाखाली घातलेल्या जाचक आणि असंवैधानिक अटी रद्द कराव्यात, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सरचिटणीस प्रथमेश आबनावे यांनी केली आहे.

**डेंग्यू**

डेंग्यूचा प्रसार आणि तीव्रता शोधण्यासाठी चार प्रकारच्या विषाणूंचा अभ्यास करण्याकरिता बी. जे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयानं पुढाकार घेतला आहे. यातून डेंग्यूच्या अभ्यासासाठी जनुकीय क्रम निर्धारण म्हणजे जीनोम सिक्विंन्सिंग केलं जाणार आहे. डेंग्यूच्या रूग्णांमधील वाढ, विशिष्ट लक्षणं, तापाचा प्रकार, याबाबत विश्लेषण केलं जाणार आहे. भविष्यात डेंग्यूच्या लसीसाठी या अभ्यासाचा उपयोग होवू शकतो, असं सूक्ष्म जीव विभागाचे डॉक्टर राजेश कार्यकर्ते यांनी सांगितलं.

**भरती**

पुण्यात 1 हजार 219 पदांसाठी पोलीस भरती प्रक्रिया शिवाजीनगर पोलीस मुख्यालयात आज सुरु झाली आहे. यासाठी एक लाख 81 हजार 769 उमेदवारांनी अर्ज केले आहेत.

**शेततळे**

राज्यात मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेतून मागेल त्याला शेततळे योजनेत चालू वर्ष 2024 मध्ये 15 हजार शेततळे उभारण्याचं उद्दिष्ट निश्चित करण्यात आलं आहे. त्यासाठी अनुदानापोटी 100 कोटी रूपये मंजूर केले असल्याची माहिती पुणे कृषी विभागाचे मृदसंधारण आणि पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन संचालक रवींद्र भोसले यांनी दिली.

**वैद्यकीय**

पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाच्यावतीने शहरातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येणारी शहरी गरीब योजनेच्या धर्तीवर आता महापालिकेच्या कर्मचा-यांसाठी राबविण्यात येणारी वैद्यकीय सहाय्य योजना लवकरच ऑनलाईन करण्यात येणार आहे. या योजनेखाली 70 हून अधिक खासगी रूग्णालयांमध्ये नागरिकांना उपचार घेता येतात.

**क्रीडा**

एसएनबीपी प्रशालीच्या वतीनं येत्या शनिवारपासून आंतरशालेय जिल्हा क्रीडा स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. या स्पर्धेत शहरातील 24 शाळांनी सहभाग नोंदवला असून ही स्पर्धा 29 जूनपर्यंत चालेल. चार वयोगटातील मुलांसाठी योगासनं, हॉकी व्हॉलीबॉल, फुटबॉल, क्रिकेट, बुद्धिबळ, लंगडी, किक बॉक्सिंग, स्केटिंग, कराटे हँडबॉल अशा सांघिक आणि वैयक्तिक क्रीडा प्रकारांचा समावेश आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**